**<u>येवला येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात</u>**

**<u>गुन्ह्याचा तपशील</u>**

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९३२/२०२४</u>** **<u>नि.क्र. –०३</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याची तारीख | ३१/१०/२०२४ |
| २ | प्रकरण दाखल केल्याची तारीख | १३/१२/२०२४ |
| ३ | फिर्यादीचे नाव | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस निरिक्षक, येवला शहर पोलीस स्टेशन, येवला. |
| ४ | आरोपीचे नाव व पत्ता | चेतन टिपु शिंदे,<br>वय– २४ वर्षे, धंदा–मजुरी,<br>रा. संजय गांधी नगर, येवला, ता. येवला, जि. नाशिक. |
| ५ | गुन्ह्याचा तपशीलः | |

तुम्ही आरोपी दि. ३१/१०/२०२४ रोजी १२.३० वाजताच्या सुमारास मौजे येवला संजय गांधी नगर, जुना सरकारी दवाखान्याच्या जवळ एक झाडाखाली, येवला, ता. येवला, जि. नाशिक येथे शासनाच्या आदेशाचे व पोलीसांचे आदेशांचे उल्लंघन करुन पैशाची पैज लावुन रनिंग टेबल मटका नावाचा जुगार खेळत असतांना तुमचेकडुन जुगाराचे साहित्य, चाळीस पत्ते व अंक असलेला पेपर व रोख रक्कम रुपये ९२०/– जवळ बाळगली व त्याआधारे आपण मुंबई जुगार कायदा कलम १२–अ अन्वये गुन्हा केला व तो या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

**दि. ०३/०८/२०२६.** **(जे. आर. पठाण)**

**येवला.** न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, येवला.

**आरोपींचे प्रतिकथनः**

प्र.क्र.१ तुम्हाला दोषारोपाच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तरः होय.

प्र.क्र.२ तुम्हाला गुन्ह्याचा तपशील समजला काय?

उत्तरः होय.

प्र.क्र.३ तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तरः होय. मला गुन्हा कबुल आहे.

........................
आरोपी क्र.

आरोपीला गुन्हयाचा तपशील त्यांच्या मातृभाषेत वाचून, समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबुल केला आहे.

**दि. ०३/०८/२०२६.** **(जे. आर. पठाण)**
**येवला.** न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, येवला.

**न्यायनिर्णय**

**(दि. ०३/०८/२०२६ रोजी पारीत)**

आरोपी हा स्वतः हजर झाला आहे. आरोपीने स्वखुशीने सदरचा गुन्हा कबुल केला आहे. त्यासंबंधीची पुरसिस **नि.क्रं.०३** अभिलेखावर दाखल केली आहे. आरोपीची अशी विनंती आहे की, तो घरातील एकमेव कर्ता पुरुष आहे व त्याच्यावर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. त्याला गुन्हा कबुल आहे, त्यामुळे कमी दंड करण्यावा यावा. उपरोक्त परिस्थितीत मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपीला मुंबई जुगार कायदा कलम १२–अ चे उल्लंघन केल्यामुळे दोषी ठरविण्यात येते व त्याला भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७५ नुसार त्यांना कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व दंड रक्कम रुपये ३००/– (अक्षरी रुपये तीनशे मात्र) प्रत्येकी ठोठावण्यात येतो. तसेच दंड न भरल्यास २ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

२. चलनी नोटा, रोख रक्कमेचा मुद्देमाल अपिल कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावा व उर्वरित मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

PATHAN JAHANGIR RASHEED
Digitally signed by PATHAN JAHANGIR RASHEED
Date: 2026.08.03 18:17:39 +0530

**दि. ०३/०८/२०२६.** **(जे. आर. पठाण)**
**येवला.** न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, येवला.